# १) श्री ज्ञानेश्वर महाराजांचे संक्षिप्त चरित्र

**ह. भ. प. श्री. भागवत नारायण साळुंके**

**अलंकापुरी पुण्यभूमि पवित्र । तेथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र ।**
**तया आठविता महापुण्यराशी ।**
**नमस्कार माझा सद्‌गुरू श्री ज्ञानेश्वराशी।।**

महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी 'आळंदी' हे एक पवित्र स्थान होय. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची ही नगरी. कृतयुगामध्ये आनंदवन, त्रेतायुगात वारुण, द्वापार युगी कपिल व कलियुगामध्ये अलंकापूर अशी या नगरीची युगपरत्वे नावे आहेत. पुणे शहरापासून साधारण वीस किलोमीटर अंतरावर इंद्रायणी नदीकिनारी वसलेल्या या गावी श्री ज्ञानेश्वर महाराजांची संजीवन समाधी आहे.

आळंदी हे ज्ञानदेवांचे आजोळ म्हणजे त्यांच्या आईचे माहेर. श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पूर्वज मराठवाड्यात पैठणपासून जवळ गोदावरी नदीच्या किनारी असलेल्या आपेगावचे कुलकर्णी. त्र्यंबकपंत हे ज्ञानदेवांचे पणजोबा. ते वेदशास्त्रसंपन्न होते. शिवाय बीड येथे देशाधिकारी होते. गोविंदपंत हे त्र्यंबकपंतांचे पुत्र. गोविंदपंतांचे पुत्र विठ्ठलपंत हे ज्ञानेश्वरांचे वडील. पैठण येथे विठ्ठलपंतांनी वेदाध्ययन केले व नंतर भारतभरातील तीर्थांच्या यात्रेसाठी ते बाहेर पडले. त्या यात्रेदरम्यान त्यांचे आळंदीला येणे झाले. इंद्रायणी तीरी असलेल्या सिद्धेश्वराच्या देवळात उतरले.

त्या वेळी सिद्धोपंत नावाचे गृहस्थ आळंदीत राहत होते. २४ गावांचे कुलकर्णीपद त्यांच्याकडे होते. उमाबाई ही सिद्धोपंतांची पत्नी व रुक्मिणी ही या दांपत्याची कन्या. ती तेव्हा उपवर झालेली होती.

सिद्धोपंत सिद्धेश्वराच्या दर्शनाला गेल्यावर विठ्ठलपंतांची त्यांची भेट झाली. परिचय झाला. दुसरे दिवशी विठ्ठलपंतांना सिद्धोपंतांनी आपल्या मुलीच्या पाणिग्रहणाचा प्रस्ताव ठेवला. विठ्ठलपंतांनी ते मान्य केले नाही. मात्र त्याच रात्री पांडुरंगाच्या स्वप्नदृष्टांताने विठ्ठलपंतांस हीच आज्ञा केली. विठ्ठलपंत हे सिद्धोपंतांचे जावई झाले.

विठ्ठलपंतांनी आपली उर्वरित यात्रा पूर्ण केली. नंतर सिद्धोपंत विठ्ठलपंत-रुक्मिणी या दांपत्यासह आपेगावी गेले. तिथे लेक-जावयास सोडून ते आळंदीस आले. काही काळाने वार्धक्याने विठ्ठलपंतांचे आई-वडील निवर्तले. विठ्ठलपंतांस उदास वाटू लागले, तेव्हा सिद्धोपंतांनी त्यांना आळंदीत आणले. विरक्त वृत्तीच्या विठ्ठलपंतांचे संसारात मन रमेना. ''मला संन्यास घ्यावा वाटतो,'' असं ते सतत पत्नीला म्हणू लागले. एकदा सहज रुक्मिणी म्हणाली, ''जा घ्या संन्यास.'' पुढील गांभीर्य रुक्मिणीस नव्हते. तेवढ्या वाक्याने परवानगी समजून विठ्ठलपंत घराचा त्याग करून खरोखर निघून गेले.

विठ्ठलपंत काशी क्षेत्री गेले. रामानंद स्वामी नामक महात्म्याच्या आश्रमात जाऊन आपली संन्यासी होण्याची इच्छा त्यांनी स्वामींना सांगितली. त्यांना स्वामींनी संन्यास दीक्षा दिली. 'चैतन्याश्रम' असे विठ्ठलपंतांचे नवीन नामकरण झाले.

इकडे आळंदीत रुक्मिणी विठ्ठलपंतांची वाट पाहत असतानाच ते संन्यासी झाल्याची वार्ता समजली, तेव्हा रुक्मिणीने आपला दिनक्रम आखला. पहाटे उठून इंद्रायणीवर स्नान करावे, सिद्धेश्वराची पूजा करावी व मंदिराच्या प्रांगणात असलेल्या पिंपळाला ती मनोभावे भगवंताचे नामस्मरण करत प्रदक्षिणा करू लागली. अशी बारा वर्षे निघून गेली. आणि एक प्रसंग घडला.

रामानंद स्वामी काशीहून तीर्थयात्रेसाठी निघाले. त्यांना दक्षिण

भारतात रामेश्वराला जायचे होते. त्या प्रवासादरम्यान ते आळंदीत आले. सिद्धेश्वराच्या मंदिरात पिंपळाला प्रदक्षिणा घालताना रुक्मिणीने रामानंद स्वामींना पाहिले. सत्पुरुषाचे आशीर्वाद घ्यावेत म्हणून तिने त्यांना नमस्कार केला. तेव्हा 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद त्यांनी दिला. ते ऐकून रुक्मिणीला हसू आले. हसण्याचे कारण स्वामींनी विचारले, तेव्हा ''माझ्या दुर्दैवाला मी हसले'' असं सांगून आपली चरित्र कहाणी रुक्मिणीने स्वामींना कथन केली.

सर्व वृत्तांत ऐकल्यावर स्वामींनी तिच्या पतीच्या काही शारीरिक खुणा विचारल्या. तिने केलेल्या वर्णनावरून स्वामींना काहीसा अंदाज लागला की, आपला नवोदित शिष्य चैतन्य हाच हिचा पती असेल की काय? तेव्हा पुढे रामेश्वराला जाण्याऐवजी ते सिद्धोपंतांना घेऊन थेट काशीला गेले. चैतन्याला त्यांनी खरी हकिकत विचारली, तेव्हा आपण गृहस्थी असल्याची कबुली त्याने दिली, व गुरुजींची क्षमा मागितली.

रामानंद स्वामींनी विठ्ठलपंतांना सांगितले, ''तू पुनःश्च गृहस्थी होऊन संसार कर!''

गुरू आज्ञा प्रमाण मानून विठ्ठलपंत सिद्धोपंतांसोबत पुन्हा आळंदीस आले. संन्यासातून पुन्हा संसारात आल्यामुळे धर्मशास्त्राचे कारण पुढे करत त्यांना समाजाने आरुढपतित घोषित केले. विठ्ठलपंतांवर तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेने बहिष्कार टाकला.

लोकांकडून होणारा छळ सोशित विठ्ठलपंत-रुक्मिणी संसार करू लागले. सदर प्रकाराच्या मनस्तापात सिद्धोपंत देवाघरी गेले, तेव्हा आळंदी गावाच्या पश्चिम बाजूस असलेल्या सिद्धबेट परिसरात विठ्ठलपंत झोपडी करून आपल्या पत्नीसह राहू लागले. दोन-दोन वर्षांच्या फरकाने त्यांना चार अपत्ये झाली. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान या तीन

मुलांसह शेवटी मुक्ता ही एक कन्या झाली.

मुले वाढू लागली मात्र उंबरठ्याबाहेर त्यांची प्रचंड अवहेलना होऊ लागली. 'संन्याशाची पोरे' म्हणून त्यांना हिणवलं जाऊ लागलं.

काही काळ या त्रासापासून आपण मुलांसह दूर असावे असा विचार करून विठ्ठलपंत कुटुंबाला घेऊन त्र्यंबकेश्वरी गेले. कुशावर्तावर स्नान करून ब्रह्मगिरी प्रदक्षिणा करण्याचा नित्यनेम त्यांनी केला.

असेच एकेदिवशी मुलांसह गिरी प्रदक्षिणा करीत असता त्यांना वाघ दिसला. घाबरून विठ्ठलपंत व रुक्मिणी यांनी मुलांना जवळ घेतले. मात्र त्या लगबगीत थोरला निवृत्ती आणि इतर सर्व यांची ताटातूट झाली. पळता पळता निवृत्तीने एका गुहेत प्रवेश केला. तिथे एक योगी तप करत बसले होते. 'गहिनीनाथ' हे त्यांचे नाव. निवृत्तीने गहिनीनाथांना नमस्कार केला. सात दिवस निवृत्ती गहिनीनाथांच्या सहवासात राहिले. गहिनीनाथांनी अनुग्रह केला. नाथपंथाची दीक्षा दिली. कृष्णनामाची उपासना सांगितली. निवृत्तीनाथ होऊन ते तिथून बाहेर पडले.

गहिनीनाथांकडून ज्ञानसंपन्न झालेले निवृत्तीनाथ कुटुंबीयांना भेटले व ज्ञानदेवांना तोच तत्त्वोपदेश त्यांनी केला. लौकिक नात्याने ज्येष्ठ बंधू असलेले निवृत्तीनाथ हेच ज्ञानदेवांचे गुरू झाले. आपली गुरुपरंपरा श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात –

**आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य।।**
**मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती।।**
**गहिनी प्रसादे निवृत्तीदातार । ज्ञानदेवा सार चोजविले।।**

ब्रह्मगिरी प्रदक्षिणेच्या निमित्ताने नाथपंथाची परंपरा ज्ञानदेवांना अशा प्रकारे प्राप्त झाली, मात्र लौकिक आयुष्यातील फरफट काही थांबली नव्हती.

कुलपरंपरेने मुलांवर मौजीबंधनादी संस्कार झाले पाहिजेत, अशी तळमळ विठ्ठलपंत-रुक्मिणी यांना होती. आपण प्रवाहपतित असल्यामुळे ते शक्य नाही. तेव्हा यावर काहीतरी मार्ग निघावा, यासाठी विठ्ठलपंत आळंदीच्या ब्रह्मसभेपुढे गेले. त्यांना विनंती करून बोलले -

मला आपण प्रायश्चित सांगा मी ते करतो, मात्र माझ्या मुलांवर उपनयनादी संस्कार होणे आवश्यक आहे.

त्या ब्रह्मवृंदांना विठ्ठलपंत व त्यांच्या परिवाराची दया आली नाही. त्यांना प्रायश्चित सांगण्यात आले - 'देहांत'! विठ्ठलपंतांचा नाइलाज झाला. परंतु त्यांनी ठरवले, आपल्या जाण्याने - मुलांचा रस्ता सुखकर होणार असेल तर चांगलेच आहे. एके रात्री थोरल्या निवृत्तीस कल्पना देऊन विठ्ठलपंत-रुक्मिणी घराबाहेर पडले व जगाचा निरोप त्यांनी घेतला.

आई-वडिलांच्या शिवाय पोरकेपणी ही चारी भावंडे राहू लागली. विठ्ठलपंतांनी ज्या उद्देशाने ब्रह्मसभेचा निर्णय स्वीकारला होता तो उद्देश मात्र किंचितही सफल झाला नाही. आई-वडिलांनी प्रायश्चित घेऊनही मुलांना समाजाने स्वीकारले नाही. छळ सुरूच राहिला.

समाजाने दिलेल्या त्रासांपैकी काही ठळक घटना ज्ञानदेवांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या ठरल्या. एकेदिवशी कोरान्न भिक्षेसाठी गावात आलेल्या ज्ञानदेवांना अवमानित करून त्यांची भिक्षा मातीत टाकली गेली, तेव्हा उद्विग्न झालेले ज्ञानदेव घराची ताटी (दरवाजा) लावून बसले. आता बाहेर यायचेच नाही असा निर्णय त्या वेळी त्यांनी घेतला, तेव्हा छोट्या मुक्ताईने तात्त्विक भाषेत त्यांचे सांत्वन केले. या संभाषणातूनच यांच्या वाङ्मयीन कार्याची मुहूर्तमेढ रोवली. मुक्ताईने ज्ञानदेवांना केलेल्या उपदेशाचे अकरा अभंग तयार झाले. 'ताटीचे अभंग' म्हणून ते प्रसिद्ध आहेत.

एके दिवशी निवृत्तीनाथांना मांडे खाण्याची इच्छा झाली, तेव्हा ते मांडे भाजण्यासाठी खापर (मातीचे भांडे) प्रस्थापितांनी मिळू दिले नाही. तेव्हा थापलेले मांडे ज्ञानदेवांनी आपल्या पाठीवर टाकण्याची आज्ञा केली. पाठीवर मुक्ताईने मांडे टाकले आणि ज्ञानदेवांनी शरीरातील 'वैश्वानर' नामक अग्नी प्रज्वलित केला, तद्वारा पाठीवरचे मांडे भाजून निघाले.

आई-वडिलांविना कालक्रमणा चालू होती. समाज त्रास देण्याची संधी सोडत नव्हताच. एके दिवशी ज्ञानदेव निवृत्तीनाथांना म्हणाले, 'आपण पैठणला जाऊन आपल्या उपनयन संस्काराचा उपाय विचारू.' पैठण ही त्या वेळी दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेली नगरी होती.

पैठणला मजल-दरमजल करत हे चौघेजण गेले. तिथेही प्रारंभी यांची थट्टा उडवण्यात आली. निवृत्ती, ज्ञानदेव या नावावरून कुणीतरी हिणवले. रस्त्याने एक पाणी वाहणारा रेडा चालला होता. त्याच्याही मालकाने ज्ञान्या असे त्याचे नाव ठेवलेले होते. तेव्हा नामसादृश्यावरून 'तू आणि तो रेडा एकच का रे?' अशी वल्गना करणारा प्रश्न ज्ञानोबांना केला गेला. तेव्हा ''आत्मदृष्ट्या तो व मी एकच आहे,'' असे उत्तर ज्ञानदेवांनी दिले. तेव्हा त्या रेड्याच्या पाठीवर चाबकाचे फटके मारले त्याचा परिणाम, ज्ञानदेवांच्या पाठीवर वळ उमटले.

या चमत्कृतीवरही एकजण बोलला. ही काळी जादू आहे. मग 'जे ज्ञान तुमच्याकडे आहे ते रेडा सांगू शकेल का?' असा सवाल केला. तेव्हा ज्ञानदेवांनी रेड्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याला ऋग्वेद म्हणण्याची आज्ञा केली. क्षणातच रेडा वेदाच्या पंक्ती उच्चारू लागला. थट्टा करणारे लोक खजिल झाले. ज्ञानदेवांचा महिमा जाणवला, लोक जयजयकार करू लागले.

पैठणहून आळंदीला परत येत असताना नेवासा या गावी मोहिनीराज

मंदिरात ही मंडळी थांबली. तिथे साधारण दोन वर्षे हे थांबले. निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना ग्रंथ निर्मितीची आज्ञा केली. श्रीमद्‌भगवद्‌गीता या ग्रंथावर मराठीत भाष्य करणारा ग्रंथ रचण्याची आज्ञा होती.

हा ग्रंथ ज्ञानदेव सांगू लागले तेव्हा ते लिहून घेण्याची जबाबदारी होती, सच्चिदानंद बाबा यांच्यावर. हे सच्चिदानंद बाबा ज्ञानदेवांना पैठणहून येतानाच भेटले. या भेटीचा प्रसंग विलक्षण आहे.

नेवाशाला येण्याअगोदर नुकतीच एक प्रेतयात्रा यांना दिसली. एका पुरुषाचे निधन झाले होते. त्याची पत्नी सती जायला चालली होती. जाताजाता या संतांचे दर्शन व्हावे म्हणून ती ज्ञानदेवांना नमस्कार करू लागली.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी विचारले, ''कोण वारलं आहे?'' लोकांनी सांगितलं, ''सच्चिदानंद!'' तेव्हा माऊली बोलले, ''सत् चिद् आनंद स्वरूप असणाराला मृत्यू कसा?'' त्या प्रेतावरून ज्ञानोबांनी हात फिरवला. झोपेतून उठावे तसे सच्चिदानंद उठले. आपली यात्रा संपलीच होती. या महात्म्याने आपल्यावर कृपा केली, तेव्हा उर्वरित काळ हा यांच्याच सेवेत घालवावा या उद्देशाने सच्चिदानंद ज्ञानदेवांच्या सोबतच आले. तेच बाबा आपल्या ग्रंथाचे लेखनिक म्हणून ज्ञानदेवांनी नेमले.

गीतेवर आधारित 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथानंतर, 'अनुभवामृत' अथवा 'अमृतानुभव' हाही ग्रंथ तिथेच निर्माण झाला. पुढे आळंदीला आल्यावर एके दिवशी चांगदेव नामक योग्याचे कोरे पत्र ज्ञानदेवांना आले. कारण ते पत्र लिहायला घेतले तेव्हा चांगदेवांना समजेना की, नेमके काय लिहावे. मायना लिहिण्यातच अडचण आली. नमस्कार लिहावे तर आपल्यापेक्षा वयाने लहान आहेत. आशीर्वाद द्यावा तर अधिकार मोठा आहे. म्हणून कोरेच पत्र दिले, त्याच पत्रावर उत्तरादाखल पासष्ट ओव्या ज्ञानदेवांनी लिहून दिल्या. 'चांगदेव पासष्टी' नावाने तो एक

छोटा ग्रंथ यानिमित्ताने तयार झाला.

त्या ६५ ओव्यांचा अर्थ चांगदेवांना उमगला नाही, तेव्हा ते प्रत्यक्ष ज्ञानदेवांना भेटायला निघाले. मात्र काहीसा अहंकार अजूनही शिल्लक होता म्हणून योगसामर्थ्याने प्राप्त असलेल्या सिद्धीच्या उपयोगाने ते वाघावर बसून आले. चांगदेवाचे गर्वहरण करण्यासाठी ज्ञानोबा एका भिंतीवर बसून त्या भिंतीलाच हवेतून घेऊन सामोरे गेले. निर्जीव भिंत अशी आकाशमार्गाने ज्ञानदेवांनी चालवली हे पाहून चांगदेवांनी शरणागती केली. तेव्हा चांगदेवाच्या गुरुत्वाची संधी ज्ञानदेवांनी मुक्ताईला दिली.

विठोबाच्या भक्तिप्रेमाच्या वर्णनाचे अनेकविध अभंग, गौळणी, विरहिणी यांसह वारकऱ्यांच्या नित्यपाठासाठी सत्तावीस अभंगांचा हरिपाठ ज्ञानदेवांनी तयार केला.

पंढरपुरात विठोबाच्या भेटीला गेल्यावर ज्ञानदेवांची व नामदेवांची चांगली मैत्री जमली. दरम्यान गोरोबा कुंभार, चोखामेळा, नरहरी सोनार, सावता माळी इत्यादी संतांची एक मांदियाळी घडून आली.

श्री ज्ञानेश्वर महाराज व श्री नामदेव महाराजांनी मिळून भारतभरात तीर्थयात्रा केली.

आपले इहलोकीचे कार्य आटोपून आपण समाधिस्थ व्हावे, असा विचार आयुष्याच्या अगदी बाविसाव्याच वर्षी ज्ञानदेवांनी केला. पंढरपुरात आपण समाधी घ्यावी, असे त्यांना वाटले. परंतु पांडुरंगाने ज्ञानदेवांच्या समाधीचे स्थळ आळंदी हे निवडले. सिद्धेश्वराच्याच दरबारात इंद्रायणीतीरी ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेतली.